# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६**

## नियोजन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ओ-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०५, ग्रामीण रोजगार**<br>**बाब क्रमांक: १२१, रूपये:- ८०,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | १०२८ | १० | सांगोला तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत, फळबाग लागवड योजनेमधील १०० दिवसांपेक्षा अधिक मजुरांची मजूरी ६२ लक्ष ४०० रुपये इतकी प्रलंबित आहे. तरी सांगोला तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांची मजूरी ६२ लक्ष ४०० रुपये इतके अनुदान तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १०३१ | १० | सांगोला तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत, फळबाग लागवड योजनेअंतर्गत कुशल अनुदानामधील खते, औषधे, रोपे यांचा निधी १ कोटी १० लाख इतका प्रलंबित आहे, तरी शेतकऱ्यांचे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत, फळबांग लागवड योजनेतील कुशलचे अनुदान १ कोटी १० लक्ष रुपये इतके अनुदान तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १०३२ | १० | सांगोला तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत, ४६ सिंचन विहिरीचे कुशल अनुदानामधील यंत्रसामुग्री, सिंचन विहीरीसाठी आवश्यक असलेल्या संरक्षक कठड्याच्या बांधकामाचे रु. २८ लाख २० हजार २४६ इतक्या रकमेची देयके प्रलंबित आहेत, तरी कुशल अनुदानामधील सिंचन विहिरीचे प्रलंबित देयके तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (४) | १०३९ | १० | महाराष्ट्र गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अंतर्गत यवतमाळ तालुक्यातील मंजुर झालेल्या VR नंबर आलेल्या पांदण रस्त्यांना त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असुन MRGS अंतर्गत कंत्राटी कर्मचा-यांना शासकीय सेवेत घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ओ-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५१, सचिवालयीन-आर्थिक सेवा**<br>**बाब क्रमांक: १२२, रूपये:- ६,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (५) | १०५० | १०० | आरे वसाहतीमधील बिगर आदिवासी भागात नागरी सोयी-सुविधा (रस्ते, पाणी, वीज) पुरवण्यासाठी शासनाकडून नियोजन विभागामार्फत विशेष निधीची तरतूद करण्यात आलेली नाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १०५१ | १०० | आरे वसाहत (आदिवासी पाडे): आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य आणि प्राथमिक शिक्षणासारख्या मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (७) | १०५२ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्र: या क्षेत्रातील विविध झोपडपट्टी भागांत राहणाऱ्या नागरिकांच्या नागरी सुविधांसाठी जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) कडून पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १०५४ | १०० | MMRDA वसाहत, पूनमनगर येथील स्थानिक मुलांसाठी आणि नागरिकांसाठी नव्याने अद्ययावत खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १०५५ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील विविध दलित वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते, गटारे, पथदिवे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अद्यापही अपूर्ण आहे. या वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १०५६ | १०० | जोगेश्वरी पूर्व भागातील गलिच्छ वस्त्यांची (झोपडपट्ट्यांची) घनता मोठी आहे. या भागात सार्वजनिक स्वच्छतागृहे, सांडपाणी निचरा व्यवस्था आणि आरोग्यविषयक सुविधांचा प्रचंड अभाव आहे. येथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियोजित आराखड्यात ठोस तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १०५७ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील मौजे कोंडीविटा येथील नगर भूमापन क्रमांक ५९४ ही जागा आरक्षित आहे. या जागेवर स्थानिक कलाकार आणि नागरिकांच्या सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी एक सुसज्ज नाट्य सभागृह उभारण्याची अत्यंत गरज आहे. वारंवार मागणी करूनही या प्रकल्पासाठी आवश्यक निधी आणि प्रशासकीय मंजुरीबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | १०७१ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यांचे म.न.पा. विकास आराखड्यातील (DP) जे रस्ते सध्या भारग्रस्त आहेत, अतिक्रमित आहेत किंवा ज्यांचे भूसंपादन प्रलंबित आहे, असे रस्ते तातडीने ताब्यात घेऊन ते नागरिकांसाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात यावेत. या कामासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्याची आवश्यकता , वाहतूक कोंडी शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे अस्तित्वात असलेल्या रस्त्यांवर मोठा ताण येत आहे. भारग्रस्त रस्ते मोकळे न झाल्याने समांतर रस्ते उपलब्ध नसणे, अतिक्रमण अनेक डीपी रस्ते कागदावर आहेत, परंतु प्रत्यक्षात तिथे अनधिकृत बांधकामे किंवा झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण असणे, भूसंपादन विलंब: मोबदला किंवा TDR च्या तांत्रिक अडचणींमुळे महत्त्वाचे रस्ते वर्षानुवर्षे बंद आहेत, ज्यामुळे सार्वजनिक सोयी-सुविधा पोहोचवण्यात अडथळा येत असणे, नागरी सुविधा आपत्कालीन परिस्थितीत (उदा. रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलाची गाडी) अरुंद रस्त्यांमुळे जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, प्रशासनाने अशा भारग्रस्त रस्त्यांची यादी जाहीर करून, टप्प्याटप्प्याने 'भूसंपादन आणि रस्ते विकास' यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नियोजन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई